N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** बुलढाणा शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0918 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनाक आणि वेळ):** 17/09/2026 13:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिंनाक पासून):** 16/07/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 16/07/2026
   **Time From (वेळेपासून):** 11:56 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:13 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 17/09/2026 **Time (वेळ):** 12:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 024

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 17/09/2026 12:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उपवन संरक्षक कार्यालय बुलडाणा, उपवन संरक्षक कार्यालय बुलडाणा, बुलडाणा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भागोजी पदमाकर चोरमले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत, प्रतिबधक विभाग बुलढाणा,बुलढाणा, बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत, प्रतिबधक विभाग बुलढाणा,बुलढाणा, बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9552520188

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल जगदेव वाघ | | | 1. वनसर्वेक्षक उपवनसंरक्षक , कार्यालय , बुलढाणा, अंबिकानगर, सागवन, ताजिबुलढाण,बुलढाणा,बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिंयाद, लाप्रवि बुलढाणा, दिंनाक 16.09.2026 मी भागोजी पदमाकर चोरमले, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, बुलढाणा फिंयाद देतो की, दिंनाक 09.07.2026 रोजी तक्रारदार इम्रान अली मुस्ताक अली, वय 40 वर्षे, व्यवसाय सुतारकाम, रा.चंडीका चैक, हिवरखेड, ता. तेल्हारा जि.अकोला यांनी लाप्रवि कार्यालयात समक्ष हजर येवुन तक्रार नोंदविली की, ते सुतारकाम करण्याचा व्यवसाय करीत असुन त्यांनी अंदाजे एक महीन्यापुर्वी सोनाळा ता.संग्रामपुर शिवारात श्री.प्रकाश गोतमारे व श्री.हेमंत वर्मा या शेतक-यांकडुन सागवान चे झाडे विकत घेवुन वनविभागाच्या परवानगीने तोडले होते. तोडलेल्या सागवान लाकडाची वाहतुक करण्यासाठी वनविभागाची वाहतुक परवानगी (Transit Pass) घेणे आवश्यक असल्याने दोन्ही शेतकरी यांनी वनविभाग जळगाव जामोद येथे अर्ज सादर केला होता. सदरचा अर्ज वनविभाग जळगाव जामोद यांनी पुढील कारवाईकरीता वनविभाग कार्यालय बुलढाणा येथे पाठविला होता. त्यासंबधाने तक्रारदार यांनी बुलढाणा उपवनसंरक्षक कार्यालयातील लोकसेवक श्री.वाघ यांना संपर्क केला असता त्यांनी सांगीतले की, वाहतुक परवानगीचा अर्ज त्रुटी पुर्तता करीता परत वनविभाग कार्यालय जळगाव जामोद यांच्याकडे पाठविला आहे. सदरची त्रुटी पुर्तता करुन अहवाल आल्यानंतर वनविभाग कार्यालय बुलढाणा येथे श्री.गाडवे साहेब यांना येवुन भेटा, त्यांना लाकुड वाहतुक परवानगीचे (Transit Pass) काम करुन देण्यासाठी 2000/- रुपये दयावे लागतील, असे सांगीतले. त्यानुसार तक्रारदार यांनी वनविभाग जळगाव जामोद येथुन त्रुटी पुर्तता करुन लाकुड वाहतुक परवानगीचे (Transit Pass) कागदपत्रांचे पाकीट बुलढाणा वनविभाग कार्यालयातील बाबु श्री.गाडवे यांना देण्यासाठी सोबत घेवुन आले असुन सदर पाकीट लोकसेवक श्री.वाघ व श्री.गाडवे यांना देतांना ते तक्रारदार यांना 2000/- रुपये लाचेची मागणी करतील अशी खात्री झाल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग बुलढाणा घटकाकडे तक्रार दिली.

दिंनाक 09.07.2026 रोजी तक्रारदार इम्रान अली यांनी दिलेल्या तक्रारीवरुन उपवनसंरक्षक कार्यालय बुलढाणा येथील लोकसेवक श्री.गाढवे व श्री.वाघ यांची लाचेसंबधी पडताळणी करणे असल्याने मा.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांना पत्र देवुन दोन कर्मचारी शासकीय पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर तक्रारदार यांची सविस्तर तक्रार नोंदवुन घेवुन तक्रारदार व पंचांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहीती देवुन पडताळणी पुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर उपवनसंरक्षक कार्यालय बुलढाणा येथील लोकसेवक श्री.गाढवे व श्री.वाघ यांची तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे लाचेची मागणी आहे किंवा कसे याची पडताळणी करण्याकरीता तक्रारदार यांच्याजवळ व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन त्यांना व पंच क्र.1 यांना उपवनसंरक्षक कार्यालय बुलढाणा येथील लोकसेवक श्री.गाढवे व श्री.वाघ यांची भेट घेण्याकरीता पाठविण्यात आले. त्यांच्यामध्ये झालेल्या भेटीदरम्यान कामासंबधी बोलणी झाली. सदर बोलणी दरम्यान लोकसेवक श्री.वाघ यांनी तक्रारदार यांना 'दो प्रकरण के दो हजार रूपये दे दो उनको' असे म्हणुन लाकुड वाहतुक परवानगीचे (Transit Pass) काम करुन देण्याकरीता लोकसेवक श्री.गाडवे यांच्याकरीता 2000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. तसेच लोकसेवक श्री.गाडवे यांनी तक्रारदार यांच्याशी कामासंबधी बोलणी केली दरम्यान तक्रारदार त्यांना, ओ वाघ सायेबसे बात हो गयी मेरी, आऊ क्या सर मै, कुछ चायपाणी लेंगे, असे म्हणाले असता लोकसेवक श्री.गाडवे यांनी, नही शुक्रीया सर. असे म्हटले. त्यांच्यामध्ये झालेल्या बोलणी दरम्यान लाचेची मागणी केली नाही. त्यावरुन लोकसेवक श्री.गाडवे यांची लाचेची मागणी संबधाने व लोकसेवक श्री.वाघ यांनी लोकसेवक श्री.गाढवे यांच्याकरीता 2000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे लाच रकमेबाबत लोकसेवक श्री.गाडवे यांची पुन्हा पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. परंतु त्या दिवशी कार्यालयीन

वेळ संपली असल्याने लोकसेवक श्री.गाडवे हे कार्यालयात हजर आहे कि नाही याबाबत माहीती नसल्याने ते कार्यालयात हजर असल्याची खात्री केल्यानंतर पडताळणी कारवाई आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. दिंनाक 09.07.2026 रोजी आयोजीत पडताळणी कारवाईचा सविस्तर पंचनामा तयार करण्यात आला.

दिंनाक 16.07.2026 रोजी तक्रारदार हे अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा कार्यालयात हजर येवुन लोकसेवक श्री.गाडवे हे सहायक वनसंरक्षक कार्यालयात हजर असल्याचे सांगीतल्याने लोकसेवक श्री.गाडवे यांची लाच रकमेसंबधाने पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानुसार सहायक वनसंरक्षक कार्यालय बुलढाणा येथील लोकसेवक श्री.गाडवे यांची पडताळणी करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे व्हॉईस रेकॉर्डर देवुन पंच क्र.1 यांच्यासोबत सहायक वनसंरक्षक कार्यालय बुलढाणा येथे लोकसेवक श्री.गाडवे यांची भेट घेण्याकरीता पाठविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.गाडवे यांची भेट घेवुन त्यांच्याशी कामासंबधी बोलणी केली दरम्यान लोकसेवक श्री.गाडवे यांनी तक्रारदार यांना, मेरे पास में नही है ना कोई प्रकरण, वहा पे, तुम्हारा देख लो वहा पे जाके, उनके पास ही दिया है ना वो टाईम पे ही. असे म्हणुन तक्रारदार यांच्याशी लाच रकमेबाबत कोणतीही बोलणी न करता, लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर तक्रारदार हे उपवनसंरक्षक कार्यालयातील लोकसेवक श्री.वाघ यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना लाकुड वाहतुक परवानगीचे (Transit Pass) काम करुन देण्यासाठी, उनका कर दिया क्या?, कर दो उनका, इनके पास दे दो, असे म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.गाडवे यांच्या नावाने स्वतःकरीता 2000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. आयोजीत पडताळणी कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा तयार करण्यात आला. त्यानुसार आयोजीत पडताळणी कारवाईवरुन लोकसेवक श्री.वाघ यांचेवर सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानुसार अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयात तक्रारदार यांना लाच रक्कम हजर करण्यासाठी सांगीतले असता त्यांनी भारतीय चलनातील 500/- रुपये दराच्या 4 नोटा असे 2,000/- रुपये हजर केले. त्यानंतर सापळा पथकातील सदस्याचे मदतीने नोटांचे वर्णन नोंद करुन सर्व नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण केली. अॅन्थ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम तक्रारदार यांचे शर्टाच्या खिशात ठेवुन तक्रारदार व पंचाना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्याबाबत सविस्तर सापळा पुर्व पंचनामा तयार केला.

त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे लोकसेवक श्री.वाघ यांच्यावर उपवनसंरक्षक कार्यालय बुलढाणा येथे सापळा कारवाई आयोजीत केली असता तक्रारदार व लोकसेवक श्री.वाघ यांच्यामध्ये कामासंबधी बोलणी झाली. दरम्यान लोकसेवक श्री.वाघ हे तक्रारदार यांना म्हणाले की, जाओ ना तुम घरको जाओ में बोल देता बस बिनधास्त जाओ तुम...ठीक है व नही जा तु.....मै कर देता बोला ना. असे म्हणुन लाच रकमेबाबत बोलण्यास टाळले व लाच रक्कम स्विकारली नाही. त्यामुळे तक्रारदार व पंच क्र.1 असे अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा कार्यालयात परत आले. त्यानंतर तक्रारदार यांनी सांगीतले की, त्यांचे काम लोकसेवक श्री.वाघ यांच्या कार्यालयात प्रलंबित असुन ते त्यांना लाच रकमेसंबधाने संपर्क करतील, त्यावेळी पुन्हा सापळा कार्यवाहीची आयोजन करावे, अशी विंनती केल्यावरुन सदर प्रकरणात तक्रारदार सांगीतील तेव्हा पुन्हा सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले.

दिंनाक 15.09.2026 रोजी तक्रारदार इम्रान अली मुस्ताक अली यांनी सांगीतले की, लोकसेवक श्री. वाघ यांना त्यांच्यावर संशय आला असावा त्यामुळे त्यांनी दिंनाक 16.07.2026 पासुन आजपावेतो त्यांना कोणत्याही प्रकारे संपर्क केला नाही, तसेच तक्रारदार यांना लाकुड वाहतुक परवानगी (Transit Pass) मिळालेली असुन त्यांचे काम झालेले आहे. त्यामुळे लोकसेवक श्री.वाघ हे आता त्यांच्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नसल्याची खात्री झाल्याने सदर प्रकरणात पुढील योग्य ती कारवाई करावी. असे सांगीतल्यानुसार त्यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे.

तरी लोकसेवक श्री.अनिल जगदेव वाघ, वय 53 वर्षे, पद वनसर्वेक्षक, वर्ग 3, उपवनसंरक्षक कार्यालय, बुलढाणा रा.अंबिकानगर, सागवन, ता.जि.बुलढाणा यांची उपवनसंरक्षक कार्यालय, बुलढाणा येथे दिंनाक 09.07.2026 रोजी 17.29 ते 18.07 वा व दिंनाक 16.07.2026 चे 11.56 ते 12.13 वा दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीमध्ये तक्रारदार इम्रान अली मुस्ताक अली यांचे लाकुड वाहतुक परवानगीचे (Transit Pass) काम करुन देण्यासाठी लोकसेवक श्री.गाडवे यांच्या नावाने स्वत:करीता 2000/- रुपये लाचेची मागणी करुन गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला त्यावरुन त्यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा होत असल्याने त्यांच्याविरुध्द माझी कायदेशिर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sangram damodhar patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

ठाणे अंमलदार
पो स्टे बुलडाणा शहर

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** sangram damodhar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)
**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)